**फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन**

**भाषा मराठीत पुरावा**

**अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र.०४ ची शपथेवर साक्ष**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः ज्योती सचिन भोईर,

वयः ३६ वर्षे, व्यवसायः नोकरी, म.पो.नाईक ब. नं. ७२,

राहणारः नागोठणे, ता.रोहा, जि.रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत :**

दिनांक २२.०९.२०२२ रोजी मी पोलीस स्टेशन, नागोठणे येथे ठाणे अंमलदार या पदावर कार्यरत होती. त्या दिवशी पोलीस कर्मचारी श्री. जगताप यांना आरोपी तिचे मौजे वरवठणे येथील घरी विना परवाना गावठी हातभट्टी दारु विक्री करीत असलयाबाबत गोपनीय बातमी मिळाली होती. त्यांनी सदर बातमी मला सांगून ते छाप्याकरीता रवाना झाले. काही वेळाने ते आरोपी व मुद्देमालासह पोलीस स्टेशनला परत आले. घडलेलया घटनेच्या अनुषंगाने श्रीमती गायकवाड यांनी माझेकडे फिर्याद दिली होती. वरिष्ठांचे आदेशाने मी त्यावरुन गुन्हा क्र.१२२/२०२२ ची नोंद केली. वरिष्ठांनी सदर गुन्हयाचा तपासस माझ्याकडे सोपविला. त्यावेळी मला खबर, छापील खबर, पंचनामा व मुद्देमाल पावती हे दस्त सोपविण्यात आले होते. मी गुन्हयाचे तपासादरम्यान साक्षीदारांची बयाणे नोंदविली. तयाचप्रमाणे मी सि.ए. परिक्षणाकरीता सिलबंद केलेला नमुना पत्र दिनांक २३.०९.२०२२ अन्वये कलिना मुंबई येथील प्रयोगशाळेत पाठविला. सदर पत्रावर माझी, पोलीस निरीक्षक व प्रयोगशाळेतील संबंधित लिपीकाची सही

असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१४** देण्यात येतो. त्या अनुषंगाने रासायनिक विश्लेषण अहवाल प्राप्त झाला. त्यास यापूर्वी नि.क्र.१३ देण्यात आला आहे. तपासाअंती आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळाल्यामुळे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. मी आरोपीला ओळखते. ती आज न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. एस. एल. ताडकर यांचेमार्फत सुरु...**

हे म्हणणे खरे आहे की, मी प्रत्यक्ष घटनास्थळी गेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे फिर्याद, पंचनामा हे दस्त कोणी तयार केले याची मला माहिती नाही, वरिष्ठांचे आदेशाने मी स्वतः फिर्याद तयार केली, मी सि.ए. परिक्षणाकरीता सिलबंद केलेला नमुना पत्रासह तपासणीकामी प्रयोगशाळेमध्ये पाठविला नव्हता, श्री. जगताप यांना गोपनीय माहिती मिळाली नव्हती, त्यांना आरोपीचे ताब्यात गावठी हातभट्टीची दारु विना परवाना मिळाली नव्हती, मी सरतपासणीमध्ये खोटी साक्ष दिली, मी प्रस्तुत गुन्हयाचा चुकीचा तपास करुन चुकीचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले, मी आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

sunil sakharam mahale
Digitally signed by sunil sakharam mahale
Date: 2023.08.01 18:26:03 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)
दि.०१.०८.२०२३ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.